दैनिक

जनसामान्यांच स्वतंत्र व्यासपीठ

# स्टार बातमी

RNI NO. : MAHMAR/2011/38724

वर्ष १३, अंक ४० , गुरुवार, दिनांक १३ जून २०२४, पृष्ठ ४, किंमत २/- रुपये

# सर्व मागासवर्गीय विद्यार्थ्यांचे शिष्यवृत्तीचे प्रश्न मार्गी लावणार- केंद्रीय राज्यमंत्री रामदास आठवले



## सामाजिक न्याय मंत्रालयाच्या केंद्रीय राज्यमंत्री पदाचा सलग तिसऱ्यांदा पदभार स्विकारून रामदास आठवले यांनी रचला इतिहास



**मुंबई/ नवी दिल्ली :** रिपब्लिकन पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष केंद्रीय सामाजिक न्याय राज्यमंत्री ना रामदास आठवले यांनी आज सामाजिक न्याय राज्य मंत्रालयात राज्य मंत्री पदाचा पदभार स्विकारला.केंद्रीय सामाजिक न्याय राज्यमंत्री म्हणुन सलग तिसऱ्यांदा पदभार स्विकारून ना.रामदास आठवले यांनी एक विक्रम केलेला आहे. इतिहास घडवला आहे. आज शासकीय भवन नवी दिल्ली येथील सामाजिक न्याय मंत्रालयात कॅबिनेट मंत्री विरेद्रकुमार यांची भेट घेऊन त्यांनाही मंत्री पद मिळाल्याबद्दल विरेद्रकुमार यांचे अभिनंदन केले. शास्त्री भवनच्या पहिल्या मजल्यावरील कार्यालयात ना.रामदास आठवले यांनी आज केंद्रीय सामाजिक न्याय मंत्रालयाचे राज्य मंत्री म्हणुन आपला पदभार स्विकारला. त्यांच्या सोबत त्यांच्या पत्नी सौ.सिमाताई आठवले व अनेक रिपब्लिकन कार्यकर्ते उपस्थित होते.

दलित, ओबीसी सर्व मागासवर्गीय विद्यार्थ्यांचे सर्व प्रकारच्या शिष्यवृत्तीचे प्रश्न आपण लवकरच मार्गी लावणार आहोत असा निर्धार ना.रामदास आठवले यांनी आपला पदभार स्विकारताना व्यक्त केला. सामाजिक न्याय मंत्रालयाच्या अंर्तगत ज्येष्ठ नागरिक, तृतीय पंथीय, तसेच ओबीसी , अनुसुचित जाती यांचे विषय सामाजिक न्याय मंत्रालयाच्या अंर्तगत येतात. मागासवर्गीय विद्यार्थ्यांच्या शिष्यवृत्तीच्या अनेक योजना आहेत. फॉरन स्कॉलरशिप ही महत्वाची शिष्यवृत्ती योजना आहे. त्याचबरोबर दलित मागासवर्गीयांमधुन उद्योजक निर्माण व्हावा यासाठी या उद्योजकांना पुरेसा निधी मिळवून देण्यासाठी व्हेंचर कॅपिटल ही स्किम सुध्दा केंद्रीय सामाजिक न्याय मंत्रालयाने सुरु केली आहे. या सर्व स्किमच्या पूर्ततेकडे आपण लक्ष देऊन काम करणार आहोत. तसेच देशभरात सामाजिक न्याय मंत्रालयाच्या वतीने आश्रम शाळा, व्यसनमुक्ती केंद्र, ज्येष्ठ नागरिकांसाठीचे ओल्ड एज होम आदि योजना भारत सरकारने सुरु केल्या आहेत. त्यांची अंमलबजावणी प्रभावीपणे देशभरात करण्याला आपण प्राधान्य देणार असल्याचे ना. रामदास आठवले यांनी सांगितले.

यावेळी हजारो चाहत्यांनी ना. रामदास आठवले यांना पुष्पगुच्छ देऊन हार्दिक अभिनंदन केले. सलग तिसऱ्यांदा सामाजिक न्याय मंत्रालयाचे राज्य मंत्री म्हणुन पदभार स्विकारणे हा एक विक्रम असल्याचे मत त्यांच्या चाहत्यांनी व्यक्त केले आहे.यासाठी ना. रामदास आठवले यांचे देशभरातुन अभिनंदन होत आहे. रिपब्लिकन चळवळीच्या कार्यकर्त्यांकडून पुढील वाटचालीस आठवले साहेबांना हार्दिक हार्दिक शुभेच्छा.



## संपादकीय

### फडणवीस यांच्या रणनितीचा परिणाम

केंद्रात बहुमताचे सरकार असेल तर अन्य राज्यांमध्ये काहीही करून सत्ता स्थापन करता येते, हे भाजपने गेल्या १० वर्षात त्यासाठी केलेल्या अनेक उचापतीत दाखवून दिले होते. मात्र यावेळी भाजपला भरवशाच्या उत्तर प्रदेश आणि महाराष्ट्राने दगा दिला. त्यामुळे भाजपचे बहुमत हुकले. महाराष्ट्रात याची जबाबदारी स्वीकारून उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सरकारमधून मुक्त करण्याचे आवाहन केले. आपण सरकारमधून पदमुक्त होऊन पक्ष श्रेष्ठी जो आदेश देतील त्यानुसार काम करण्यास तयार असल्याचे जाहीर केले होते. त्यानंतर लगेचच दिल्लीत जाऊन पक्षाचे ज्येष्ठ नेते अमित शहा यांच्याशी चर्चा करताना आपली भूमिका स्पष्ट केली. त्यावर अमित शहा यांनी केंद्रात सत्ता स्थापन झाल्यावर यावर विचार विनिमय करून निर्णय घेऊ, तोपर्यंत संयम बाळगण्याचा सल्ला त्यांनी फडणवीस यांना दिला. दिल्लीतून आल्यानंतर फडणवीस यांनी आपल्या भूमिकेचा खुलासा करताना, हा एक रणरीतीचा भाग असून आपण पळणारा नसून लढणारा असल्याचे म्हटले होते. याचा केंद्रात मंत्रीपदे देण्यात आल्याने तर अर्थ लागत आहे. महाराष्ट्राच्या वाट्याला फक्त ६ मंत्रिपदे आली. त्यातही मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या गटाला स्वतंत्र कारभार असलेले मंत्रिपद देऊन त्यांची बोळवण केली. अजित पवार यांच्या राष्ट्रवादी काँग्रेस गटातून सुनील तटकरे खासदार झाले. त्यामुळे तटकरे किंवा प्रफुल पटेल यांना कॅबिनेट मंत्रीपद मिळावे असे अजित पवार यांचा आग्रह होता. मात्र भाजपने अजित पवार गटालाही एक स्वतंत्र कारभार असलेले मंत्रिपद देण्याची तयारी दर्शवली होती, तथापि अजित पवार यांनी राज्यमंत्रीपद नाकारून आम्हाला कॅबिनेट मंत्री पदच हवे असल्याची भूमिका दिल्लीत पत्रकार परिषदेत जाहीर केली. आता दोघांच्या बाबतीत भाजपने असा निर्णय का घेतला असावा ? हा फडणवीस दिल्लीत पक्ष श्रेष्ठींना भेटल्याचा परिणाम असल्याची चर्चा आहे. कारण या दोघांना 'रालोआ' मध्ये घेण्याचे भाजपचे काही हेतू होते. त्यानुसार शिंदेंना फोडल्याने उद्धव ठाकरे गट कमकुवत होईल. शिवाय शिवसेना शिंदे गटाच्या माध्यमातून त्यांच्या उमेदवारांसह निवडणुकीत भाजपच्या उमेदवारांना रसद मिळेल. भाजपचे मतदार – कार्यकर्ते शिंदे गटाच्या उमेदवारांना सहकार्य करतील असा अंदाज होता. त्यानुसार शिंदे गटाच्या उमेदवारांना निवडून आणण्यासाठी भाजप समर्थकांची मदत झाली. पण शिंदे गटाच्या समर्थकांची भाजपच्या उमेदवारांना साथ लाभली नाही. याच निवडणुकीत अजित पवार यांना बारामतीमध्ये स्वत:च्या पत्नीला निवडून आणता आले नाही. यावरून शिंदे व अजित पवार गटांच्या मर्यादा स्पष्ट झाल्या. कारण शिंदे गटाने १५ जागा लढवून सात जागा जिंकल्या. त्यातच उद्धव ठाकरे गटाला शिवसेनेच्या समर्थकांनी मोठ्या प्रमाणात पाठिंबा दिल्याचे स्पष्ट झाले. साहजिकच शिंदे व अजित पवार यांना अधिक महत्त्व देण्याची गरज नसल्याचे फडणवीस यांनी पटवून दिले असावे. तसेच यांच्या भरवशावर विधानसभा निवडणुकीला सामोरे गेल्यास लोकसभेच्या निवडणुकीच्या निकालाची पुनरावृत्ती होण्याचा धोका असल्याचे फडणवीस यांनी पक्षश्रेष्ठींच्या निदर्शनास आणून दिले असावे असेही म्हटले जाते. त्यामुळे शिंदे आणि अजित पवार यांच्या मागणीकडे दुर्लक्ष करण्यात आले असावे. कोकणात नारायण राणे हे निवडून आले. तरीदेखील त्यांनाही मंत्रिमंडळात स्थान दिले गेले नाही. मागच्या वेळी नारायण राणे यांच्याकडून अडीच वर्षे लघु – सूक्ष्म उद्योग खाते होते. पण अडीच वर्षाच्या मंत्रिपदाच्या कार्यकाळात त्यांना फारसा प्रभाव पाडता आला नाही, अशी चर्चा आहे. मराठवाड्यातील जनतेने भाजपकडे पाठ फिरवली. त्यामुळे मराठवाड्यालाही मंत्रिमंडळात स्थान मिळालेले नाही. त्यांनी निवडणुकीच्या तोंडावर काँग्रेसचे आदर्श नेते अशोक चव्हाण यांना भाजपने पक्षात घेऊन राज्यसभेचे खासदारही केले. त्याच अशोक रावांना नांदेडमधून भाजपचा उमेदवार निवडून आणण्यात अपयश आले. त्यांचे हे कर्तुत्व पाहूनच रालोआच्या बैठकीत अभिनंदन करण्यासाठी पुढे सरसावलेल्या अशोकरावांकडे नरेंद्र मोदींनी ढुंकूनही पाहिले नाही. असो, तर मुद्दा फडणवीस यांच्या रणरीतीचा आहे. फडणवीस यांनी दिल्ली भेटीत चाणाक्षपणे पक्षश्रेष्ठींना त्यांची चूक दाखवून देत शिंदे आणि अजित पवार यांचे महत्त्व कमी करण्यात बाजी मारण्याची राजकीय वर्तुळात चर्चा आहे. अर्थात देवेंद्र फडणवीस यांचा राजकीय मत्सुद्दिपणा वेळोवेळी दिसून आलाच आहे. पण यानिमित्ताने त्यांची झलक पुन्हा एकदा पाहायला मिळाली. आता शिंदे आणि अजित पवार यांच्यासमोर टिकून राहण्याचे आव्हान असेल !

# रामदास आठवले



आठवले साहेब पुन्हा मंत्री झाले आहेत. त्यांच्या पक्षाचे खासदार नाहीत, आमदार नाहीत, फारशी मते पण नाहीत. पण आहे दलित चेहरा. प्रतीकात्मक राजकारणासाठी जो भांडवली पक्षांना खूपच उपयोगी असतो. त्यातही दलित विरोधी समजल्या जाणाऱ्या भाजप सारख्या फॅसिस्ट पक्षांना तर खूप गरजेचं असतो. आपले प्रतिगामी चरित्र झाकण्यासाठी.

या आधी काँग्रेसच्या काळात गवई साहेब होते. (रा सू गवई) अनेक वेळा विधान परिषदेमध्ये उपसभापती नंतर सभापती राहिले आहेत. त्यांची परिस्थिती (एक अकेला) प्रमाणेच होती. तर भांडवलशाही पक्षांना अशा चेहऱ्यांची प्रतीकात्मक गरज असते. ज्यावेळी भाजप सेना युती सत्तेवर आली तेव्हाही काँग्रेसने नवीन दलित चेहरे पुढे आणले होते. आमच्या एका विद्वान मित्राचा नंबर त्यात लागला होता .पुढे काँग्रेसच्या लक्षात आले त्यांचा प्रत्यक्ष मते मिळवण्यासाठी फायदा नाही. त्यापेक्षा चंद्रकांत हांडोरे, वर्षा गायकवाड मुळे चार मते तरी मिळतात .

आठवले साहेब पुन्हा मंत्री झाले. मंत्री पदासाठी छोटे–मोठे चार दोन जागा निवडून आणलेले भाजपचे मित्र पक्ष घायकुतीला आलेले आहेत. आठवले साहेब सहज मंत्री होतात याचा अर्थ वर दिलेला आहे.

आठवले साहेब असे मी म्हटले आहे. खरे तर आमचे संबंध पॅंथर काळापासून अरे तुरेचे राहिले आहेत. पण एकदा का एखादा माणूस अधिकारी झाला तर त्याला साहेब म्हटले की अमर झाल्यासारखे वाटते. हे तर मंत्री. मग आठवले साहेब म्हटले पाहिजे. नाहीतर त्यांच्या अंधभक्तांना राग येईल. ज्यांना आपल्याबद्दल काही माहीत नसते. खरे तर आंबेडकरी चळवळीत किंबहुना समाज जीवनात साहेब हा शब्द चांगला रुजला आहे. अगदी चाळ कमिटीचा अध्यक्ष असला तरी त्याला साहेब म्हणावे लागते. साहेब म्हटले की प्रत्येकजणच खुलतो.अंगावर मूठभर मांस चढल्यासारखा वागतो. म्हणून आठवले साहेब. साहेबी संस्कृती सगळ्यात भांडवली पक्षांमध्ये आहे. समाजवादी, कम्युनिस्ट सोडून. तिथे साहेब आणि सर या गोष्टी नाहीत.

फार वर्षांपूर्वी मी दैनिक सकाळमध्ये दलित पॅंथर एक विझत चाललेला निखारा या शीर्षकाखाली लेख लिहिला होता. त्याकाळी आठवले साहेब आपल्या चार दोन कार्यकर्त्यांना घेऊन छोटे–मोठे आंदोलने करीत असत. आमदार निवास मंत्रालय या ठिकाणी हमखास दिसत. हा लेख लिहिल्यानंतर दोन–तीन दिवसांनी मी आणि राजू देशपांडे आम्ही आमदार निवासासमोर आमचे मित्र अरविंद पाटकर यांच्या पुस्तकांच्या स्टॉल होता. हा स्टॉल आमदार निवास समोर होता. तेथे हमखास आम्ही आठवड्यातून दोन–तीन वेळा जात असू. लेख लिहिल्यानंतर दोन–तीन दिवसांनी तिथे आम्हाला आठवले साहेब त्यांच्या कार्यकर्त्यांसह भेटले. म्हणाले आम्हाला ही उत्तर देता येतात. पण तू पडलास आपला माणूस. म्हणून गप्प बसलो.पण आमच्या महाराष्ट्रात ईतक्या शाखा आहेत. इतके कार्यक्रम आम्ही केले आहेत. हे पण तू लिही. आम्ही मान हलवली आणि आमची भेट संपली.

'आपला माणूस' हा आठवले साहेबांचा शब्द महत्वाचा होता. कारण एकेकाळी आमची रोजच भेट होत असे. त्यावेळी मी आदरणीय राजा ढाले यांच्या सिद्धार्थ विहार येथील रूम नंबर ५१ मध्ये रतनकुमार पाटलीपुत्र यांच्याबरोबर रहात असे.५० नंबरची रूम रामदास आठवले आणि अरुण कांबळे यांची. सकाळी दात घासताना बाथरूमला जाताना भेट व्हायची.

त्यावेळी पुरोगामी पक्ष्यांच्या अनेक सभा होत तेथे आठवले साहेब असत तेथे भेट होत असे .खूप चर्चा होत असे. एकदा छबीलदास शाळेपासून ते थेट सिद्धार्थ विहार पर्यंत आम्ही चर्चा करत चालत गेलो होतो. माझा एक नातेवाईक अशोक थोरात आमच्याबरोबर होता. तो आठवले साहेबांना खूप मोठा नेता मानत होता. नंतर मला म्हणाला आठवले साहेबांची तुझी इतकी दोस्ती आहे मी चकित झालो.

यावेळी मी मास मुव्हमेंट चे काम करत असे. दलित पॅंथर बरखास्त करून राजा ढाले यांनी मास मुव्हमेंट संघटना सुरू केली होती. ज्या मीटिंगमध्ये हा निर्णय झाला रामदास आठवले यांनी पाठिंबा दिला होता. पण नंतर ते बदलले आणि त्यांनी अरुण कांबळे बरोबर पॅंथर सुरू ठेवली. त्याचा राग राजा ढाले यांच्या कार्यकर्त्यांना होता. मास मुव्हमेंटचे कार्यकर्ते रामदास वर खार खाऊन होते. मास मुव्हमेंट पेक्षा पॅंथरला पाठिंबा मिळू गेला. कारण रामदास एक जबरी संघटक तर अरुण कांबळे तितकाच जहाल अभ्यासू वक्ता.

मला रामदास बद्दल कायम सहानुभूती राहिली. त्याच्याबद्दल प्रेम वाटे. आपल्या मर्यादा जाणणारा दुसऱ्याचे महत्व मान्य करणारा अशी त्याची एक इमेज माझ्या पुढे आहे.

तो काँग्रेसमध्ये गेला मंत्री झाला. समाज कल्याण मंत्री झाला. (दलितांसाठी कायम राखीव असलेलं मंत्रीपद) एक दिवस भेटायला गेलो लाईन मध्ये होतो मला पाहताच मंत्री महोदय म्हणाले अरे तू कशाला लाईन मध्ये थांबतोस तिकडे जाऊन बस. नंतर भेटलो. आम्ही अभिनंदन केले. त्यावेळी रामदास वर आमचे अनेक पुरोगामी, पॅंथरवाले मित्र टीका करायचे त्यांना मी रामदासचे थोडे समर्थन करित सांगायचो एकतर पॅंथर संपत आली होती अशावेळी रामदासने हा निर्णय घेतला नसता तर वडापाव खाऊन जगण्याची पाळी त्याच्यावर आली असती. ठीक आहे आता काही लोकांची कामे होतील. रामदास च्या राजकारणाबद्दल राग आणि संताप असला तरी त्याला मी जवळून ओळखत असल्यामुळे व्यक्तिगत पातळीवर त्याच्याबद्दल सहानुभूती कायम राहिली. एकदा आंबेडकरी चळवळीत महत्व संपले की कित्येक नेत्यांना कुत्ते की मौत मरण्याची वेळ येत असते. (इतरही चळवळीत अशी उदाहरणे असू शकतात) चळवळ कोणाला पोसत नाही. उलट जो चळवळीला पोसतो. तोच नेता म्हणून टिकून राहतो. रामदास, रामदास म्हणून ग्रेटच. पण नेमाडे म्हणतात तसे लेखकाचा जेव्हा लेखकराव होतो तेव्हा जी परिस्थिती उद्भवते तसेच नेमके तेच साहेब झाल्यावर होत असावे. आठवले साहेबांचे ते झाले असावे. मला माहित नाही. माझ्या अनुभवातून तो एक चांगला माणूस आहे. व्यक्तिगत पातळीवर. पण माझ्या अनुभव शेवटी माझा अनुभव आहे. प्रत्येक गोष्ट सापेक्ष असते. सर्वांना अनुभवायला येणे ही सत्याची कसोटी असते. जी गोष्ट सर्वांना अनुभवायला येते ती सत्य असते. याबाबतीत माझे म्हणणे माझे अनुभव सापेक्ष असतील. इतरांचे अनुभव काय असतील माहित नाही.

आठवले साहेब समाज कल्याण मंत्री झाले त्यांचे मोठे मोठे कट आउट बाबासाहेबांच्या उंची इतकेच बनवले गेले. एका बाजूला बाबासाहेब एका बाजूला आठवले. (मायावती आणि कांशीराम यांनी तेच केले. )डोकं ठिकाणावर असणाऱ्यांना ते आवडणार नाही. मलाही हे आवडले नाही. कुठे हिमालय......

माझी शेवटची भेट झाली तेव्हा परशुराम वाडेकर माझ्यासोबत होते. त्यांच्याच गाडीत आम्ही बसलो होतो. तेव्हा त्यांना मी साहेब न म्हणता रामदास म्हंटले. अर्थात कुठल्याही भेटीत मी त्याला साहेब म्हटले नाही. आणि त्यालाही त्याचे काही वाटले नाही. आमचे काही पुरोगामी क्रांतिकारक मित्र काँग्रेसमध्ये जाऊन काही पदांवर पोचल्यानंतर साहेबांसारखेच वागतात. त्यांना साहेब म्हटले की आवडते. रामदास निदान जवळच्या ओळखी तरी ठेवतो. मी म्हणालो शिवसेनेबरोबर जाणे एकावेळी ठीक. पण भाजप सारख्या कट्टर प्रतिगामी पक्षाबरोबर जाणे ठीक नाही. रामदास म्हणाला मग सत्ता येत नाही. थोडक्यात सेना भाजप आरपीआय एकत्र आले तर सत्ता येईल. राजकीय गणित म्हणून ते बरोबर होते. पण बाबासाहेबांच्या एकंदर प्रगतिशील जाती वर्ण विहीन राजकारणाला तत्त्वज्ञानाला संपवण्याचा प्रयत्न करणाऱ्या आणि जो प्रयत्न आजही जोरातचालू आहे. आज भाजप आर एस एस राज्यघटनेला सुरुंग लावत आहे. ती पूर्ण इतिहास जमा करण्याची त्यांची

भूमिका आहे. त्यांच्या बरोबर जाणे ही गोष्ट ज्यांना आंबेडकर वादाची एबीसीडी माहित आहे त्यांना पटणारी नाही. (दलित मध्यमवर्गाने याबाबतीत लाज सोडली आहे. गोरगरीब जनता मात्र राजकीय दृष्ट्या करेक्ट भूमिका घेत आहे.) त्या दृष्टीने बोललो. माझी भूमिका मांडली.मग आठवले साहेब म्हणाले तुझ्या सिताराम येचूरी ला सांग मला खासदार बनवले तर मी एक पायावर तयार आहे तुमच्या बरोबर यायला. थोडक्यात वैचारिकतेचा काही संबंध नाही. व्यवहार, शुद्ध व्यवहारवाद त्याच व्यवहारवादाचा आज सतत विजय आहे.

साहेबांना मंत्रिपद आपसूक मिळत आहे. या बाबतीत कुठलाही दलित नेता त्यांच्या आसपास नसावा.

सिंह म्हातारा किंवा निरुपयोगी झाला तरी सिंह आहे. त्याच्या चेहऱ्याआड दडून भुकेले लांडगे आपले इप्सित साध्य करत आहेत. आता शिकार मिळत नाही समोर आयते येऊन पडलेले मांस खाणे हेच आता सिंहाचे राजकारण आहे. दलित,आदिवासी, ओबीसी मुस्लिम,कामगार, शेतकरी एकंदरच गोरगरीब जनतेचे प्रश्न आहे तसेच आहेत. आणि तशेच राहतील. उलट आणखी बिघडतील. फुले, शाहू, आंबेडकर, मार्क्स यांच्या विचारांची दिशा घेऊन जोपर्यंत सत्ता येत नाही तोपर्यंत असेच चालू राहिल. असेच रामदास आठवले, चिराग पासवान , मायावती, आदिवासी, ओबीसी नेते कायम वापरले जातील. उच्च जात वर्गाचे बड्या बड्या देशी विदेशी भांडवलदारांचे हितसंबंध शाबूत ठेवण्यासाठी वापरले जातील.

**- आर.के.सिंग**


## वाचकांचे मनोगत

### दहशतवादाची विषवल्ली उखडून टाका

काश्मीरला विशेष दर्जा देणारे ३७० वे कलम हटवून केंद्र सरकारने काश्मीरचे त्रिभाजन केले या घटनेला या ऑगस्ट मध्ये पाच वर्ष पूर्ण होतील. ३७० वे कलम हटवल्यानंतर काश्मीरमध्ये अनुचित प्रकार घडू नये यासाठी काश्मीरमध्ये कडेकोट सुरक्षा व्यवस्था ठेवण्यात आली होती. कडेकोट सुरक्षा व्यवस्था असल्याने काश्मीरमध्ये बराच काळ शांतता होती त्यामुळे पर्यटनालाही चालना मिळाली होती. त्यामुळे नंदनवनात पुन्हा शांतता प्रस्थापित झाली असा समज निर्माण झाला होता मात्र या समजाला छेद देणारी घटना काश्मिरात घडली आहे. या घटनेमुळे काश्मीरमध्ये दहशतवाद्यांनी पुन्हा डोके वर काढले असून काश्मीरमध्ये पुन्हा घातपाती कारवाया सुरू झाल्या आहेत स्पष्ट झाले आहे. जम्मू काश्मीरच्या दिवसी जिल्ह्यातील कंदा परिसरात वैष्णवदेवीच्या दर्शनासाठी जात असलेल्या भाविकांच्या बसवर दहशतवाद्यांनी भ्याड हल्ला केला त्यात १० भाविक मरण पावले तर ३३ हून अधिक भाविक जखमी झाले. गेल्या काही दिवसात काश्मीरमध्ये झालेला हा पहिलाच मोठा भीषण हल्ला म्हणता येईल अर्थात काश्मीर खोऱ्यात कडेकोट बंदोबस्त असूनही लहान मोठे हल्ले चालूच होते मात्र या हल्ल्याने काश्मीरमध्ये पुन्हा दहशतवादी मोठ्या प्रमाणात सक्रिय झाल्याचे स्पष्ट झाले आहे. या हल्ल्याचे टायमिंग देखील महत्वाचे आहे . केंद्रात नरेंद्र मोदींचा शपथविधी ज्या दिवशी होता त्याच दिवशी दहशतवाद्यांनी हा हल्ला केला याचाच अर्थ त्यांनी केंद्र सरकारला दाखवून दिले आहे की काश्मीरमध्ये दहशतवाद अजूनही कायम आहे. आपल्या देशातील नागरिकांना खायला मिळत नसताना तेथील सरकार मात्र दहशतवाद्यांना पोसत आहे. पाकिस्तान सरकार आजही दहशतवाद्यांना आर्थिक आणि लष्करी मदत करत आहे. अनेक दहशतवादी संघटनांची कार्यालये पाकिस्तानात आहेत अशाच एका दहशतवादी संघटनेने हा भ्याड हल्ला केला आहे. केंद्र सरकारने या भ्याड हल्ल्याची गांभीर्याने दखल घेऊन पाकिस्तानला जशास तसे उत्तर द्यावे. जर भारताने या दहशतवादी हल्ल्याला प्रतिउत्तर दिले नाही तर दहशतवाद्यांची मुजोरी आणखी वाढेल आणि काश्मीरमध्ये पुन्हा दहशतवाद पसरेल. ते होऊ द्यायचे नसेल तर भारतानेही आक्रमक व्हायला हवे. प्रसंगी सर्जिकल स्ट्राईक सारखा पर्याय वापरायलाही हरकत नाही. भारताने पाकिस्तानला जशास तसे उत्तर देतानाच या दहशतवाद्यांना साथ देणाऱ्या फुटिरतावाद्यांचा देखील बंदोबस्त करावा. काश्मीरमधील अनेक फुटीरतावादी नेते दहशतवाद्यांना साथ देतात. स्थानिक फुटीरतावादी लोकांची साथ असल्याशिवाय इतका मोठा हल्ला करणे दहशतवाद्यांना शक्य नाही त्यामुळे दहशतवाद्यांशी दोन हात करताना आणि पाकिस्तानला जशास तसे उत्तर देतानाच केंद्र सरकारने ही फुटिरतावादी कीड देखील मुळापासून उखडून टाकायला हवी.

**- श्याम ठाणेदार,**
**दौंड जिल्हा पुणे**

## काकुरो पहेली




खालील चौकोनातील १ ते ९ अंक अशा पध्दतीने लिहा की ते वरपासून खालपर्यंत आणि डावीकडून उजवीकडील बेरीज ही चौकोनाच्या अर्ध्या संख्येशी जुळली पाहिजे. कोणत्याही अंकाचा पुन्हा उपयोग करता येणार नाही.

## सु-डोकू

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | 9 | 3 | | | | | | |
| | 7 | | | 1 | 8 | | | 9 |
| | | 8 | 7 | 3 | | 1 | | |
| | 8 | 9 | | 5 | 1 | | 7 | 6 |
| 2 | | | | | | | | |
| | 1 | | 8 | 7 | | 4 | 9 | |
| | | 4 | | 6 | 5 | 7 | | |
| 7 | | | 3 | 2 | | | 5 | |
| | | | | | | 6 | 4 | |

एक ते नऊ आकडे आडव्या व उभ्या सरळ रेषेत अशा प्रकारे भरायचे की एका रेषेत एक आकडा एकदाच आला पाहिजे. प्रत्येक सरळ रेषेत आणि प्रत्येक लहान चौकात सर्व एक ते नऊ आकडे आले पाहिजेत. आधीच्या छापील आकड्यांची अजिबात हलवाहलव करायची नाही. प्रत्येक कोड्याला एकच उत्तर आहे.

## शब्दकोडे



**आडवे शब्द**
१.कच्च्या फळांचा रस–४
३.समक्ष–३
६.एक ग्रह–२
७.घर–२
८.विधायक–५
९.वरचेवर–४
१२.गुप्त देखरेख–३
१३.वेल–२
१५.अगदी वाटोळा–५
१६.पद्धत–२
१८.एक फूलझाड–३
१९.एक फळ–२
२०.दरी–४
२२.वायू–३
२४.अवस्था–२
२५.बोभाटा–४
२८.कृष्णाचा भाऊ–४
३०.झीज–२
३२.निकाल; उत्पनाचा हिशेब–४
३४.मारूती–४
३६.वक्रतुंड महाकाय–४
३७.धन–२
३८.लोणी–४
४०.रसाळ–४
४२.तरंग–२
४३.एक प्राणी–२
४५.सह–४
४७.साय–३
५०.धोंडा–३
५१.मिळून–३
५२.व्यक्तीचे संबोधन–२
५३.जमावखर्चाची नोंदणी करणारा–४
५४.गठडी–३
५५.अगदी काठापर्यंत–४

**उभे शब्द**
१.नहर–३
२.एक दिवस–४
३.मृत्यू–४
४.चलाख–५
५.बदफैली–३
६.बुक्क्यांनी मारणे–४
१०.बाह्यस्वरूप–४
११.पुष्कळ–४
१४.गहाण–३
१७.लाट–३
२०.एक संख्या–३
२१.रहाणीच्या पद्धतीचा दर्जा–५
२३.समुद्रातला अग्नी–५
२४.हिंदीनुसार चूक–३
२६.एक पशू–२
२७.चादर–५
२८.संकट–२
२९.जास्तीत जास्त–४
३१.एकाच पतीची दुसरी बायको–३
३३.साल–२
३५.अलौकिक गोष्ट–४
३७.विस्मृती–३
३९.व्यवस्थित–२
४०.कामाची गर्दी–४
४१.एक शब्दालंकार–३
४४.सतत–३
४५.परिवर्तन–३
४६.व्याधी–२
४८.खोटा–३
४९.एक झाड–३
५१.प्रपंच नसल्यामुळे एकटी–२
५२.तकातीचे ठाणे–२

**येथे रिकाम्या चौकटच्या दोन्ही बाजूला शब्द लिहिले आहेत. तुम्ही फक्त शब्द जोडून अर्थपूर्ण शब्द तयार करा.**

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| १.अब | | | | | एक |
| २.किति | | | | | कोट |
| ३.गैर | | | | | करी |
| ४.धन | | | | | रद |
| ५.जुना | | | | | कारी |
| ६.पर | | | | | वडी |
| ७.बेद | | | | | पाना |
| ८.माधु | | | | | सोय |

# राज्य आपत्ती प्रतिसाद दलाच्या मुख्यालय व प्रशिक्षण केंद्र स्थापनेच्या कामाला गती -शंभुराज देसाई



**मुंबई:** पश्चिम महाराष्ट्रातील जिल्ह्यात वारंवार उद्भवत असलेली पूर परिस्थिती, भूकंप प्रवण क्षेत्रात येत असलेला पाटण तालुका व रायगड, रत्नागिरी व सिंधुदुर्ग जिल्ह्याला बसत असलेला चक्रीवादळाचा फटका या आपत्तीजनक परिस्थितीमुळे राज्य आपत्ती प्रतिसाद दलाचे प्रशिक्षण केंद्र व मुख्यालय कोयनानगर येथे करण्यात येत आहे. कामाची निकड लक्षात घेता या कामाला यंत्रणांनी प्राधान्य देऊन गती द्यावी, असे निर्देश उत्पादन शुल्क मंत्री शंभुराज देसाई यांनी आज दिले.

मंत्रालयात कोयनानगर, ता. पाटण, जि. सातारा येथे राज्य राखीव आपत्ती प्रतिसाद दलाचे मुख्यालय व प्रशिक्षण केंद्र स्थापन करणेबाबत आयोजित आढावा बैठकीत मंत्री देसाई बोलत होते. बैठकीस अति. पोलीस महासंचालक अर्चना त्यागी, अतिरिक्त पोलिस महासंचालक प्रवीण साळुंखे, अतिरिक्त पोलिस महासंचालक (प्रशिक्षण) राजकुमार व्हटकर, राज्य राखीव पोलीस दलाचे पोलिस उपमहानिरीक्षक अभिषेक त्रिमुखे, गृह विभागाचे सहसचिव व्यंकटेश भट, अवर सचिव नारायण माने, तर दूरदृश्य संवाद प्रणालीद्वारे साताऱ्याचे अप्पर जिल्हाधिकारी श्री. गलांडे, जिल्हा पोलीस अधिक्षक समीर शेख यांनी चर्चेत सहभाग घेतला.

केंद्रासाठी जमीन मिळून बराच कालावधी झाला असल्याचे सांगत मंत्री श्री. देसाई म्हणाले, या कामाचे अंदाजपत्रक तातडीने तयार करावे. पर्यावरणीय परवानग्यांचा प्रस्तावाचा संबंधित विभागाने पाठपुरावा करावा. या कामासाठी जिल्हास्तरावर जिल्हा पोलीस अधीक्षक यांनी एक नोडल अधिकारी नियुक्त करावा. हे प्रशिक्षण केंद्र जागतिक दर्जाचे झाले पाहिजे. प्रशिक्षण केंद्राची निवडलेली जागा मौजे गोकुळ तर्फ हेळवाक (कोयनानगर) ही निसर्गरम्य व पर्यटनीय ठिकाण आहे. त्यामुळे प्रशिक्षण केंद्र पर्वतीय स्टेशनमधील इमारतीप्रमाणे करण्यात यावे. प्रशिक्षण केंद्राला पर्यटकांनीही भेटी दिल्या पाहिजे, अशा दर्जाचे बनविण्यात यावे, अशा सूचनाही मंत्री देसाई यांनी दिल्या. मंत्री देसाई पुढे म्हणाले, या केंद्रासाठी अंदाजपत्रक तयार करून निधी मागणी प्रस्ताव सादर करावा. पुढील दोन महिन्यात काम निविदा प्रक्रियेवर आणण्याची दक्षता घ्यावी. पोलीस गृहनिर्माण महामंडळाने आपल्या प्राधान्य क्रमाच्या यादीत या प्रकल्पाचा समावेश करावा.

या प्रकल्पासाठी वास्तू विशारद नियुक्त करून विस्तृत प्रकल्प तयार अहवाल तयार करावा. स्थानिक प्रशासनाने राज्यस्तरावरील संबंधित विभाग, राज्य राखीव पोलीस दल यांच्याशी संमन्वय ठेवून काम गतीने पुढे न्यावे, अशाही सूचना केल्या.

## नेरुळ विभागात अनधिकृत हॉटेलवर धडक कारवाई

**नवी मुंबई :** नवी मुंबई महानगरपालिका बी विभाग नेरूळ कार्यक्षेत्रांर्तगत महात्मा गांधीनगर (एम.आय.डी.सी.) डी – ब्लॉक मधील पाण्याच्या पाईपलाईन लगत असलेल्या सर्व अनधिकृत हॉटेलवर नेरूळ विभाग कार्यालयामार्फत अतिक्रमण विरोधी पथकाने निष्कासन कारवाई केलेली



आहे. त्यामध्ये श्रीकृष्ण भोजनालय व दयाशंकर गौंड यांच्या कॅन्टीनचा समावेश आहे. अतिक्रमण विभागाचे उपआयुक्त डॉ. राहुल गेठे यांच्या मार्गदर्शनाखाली या अनधिकृत हॉटेल्सवरील निष्कासन कारवाई पोलीस बंदोबस्तात करण्यात आली आहे. या मोहीमेकरीता १० मजूर, १ जेसीबी, १ डंपर व २ पिकअप व्हॅन वापरण्यात आल्या. सदरची कारवाईत नेरूळ अतिक्रमण विभागातील अधिकारी / कर्मचारी यांचे समवेत सुरक्षारक्षक, स्थानिक पोलीस यांचा सहभाग होता.

## ज्येष्ठ संगीतकार प्यारेलाल शर्मा यांना पद्मभूषण पुरस्कार प्रदान



**मुंबई :** ज्येष्ठ संगीतकार प्यारेलाल रामप्रसाद शर्मा यांना राष्ट्रपतींच्या वतीने राज्य शासनामार्फत पद्मभूषण पुरस्कार प्रदान करून आज सन्मानित करण्यात आले. राज्याचे मुख्य सचिव डॉ. नितिन करीर तसेच अपर मुख्य सचिव तथा मुख्य राजशिष्टाचार अधिकारी मनीषा पाटणकर–म्हैसकर यांनी श्री. शर्मा यांच्या वांद्रे पश्चिम येथील निवासस्थानी जाऊन त्यांना हा पुरस्कार प्रदान केला. त्याचबरोबर शाल, श्रीफळ, मानपत्र देऊन सत्कार करून त्यांचे अभिनंदन केले.

मुंबई उपनगरचे जिल्हाधिकारी राजेंद्र क्षीरसागर, राजशिष्टाचार विभागाचे उपसचिव दिलीप देशपांडे, प्यारेलाल शर्मा यांच्या पत्नी सुनीला आणि कुटुंबीय आदी यावेळी उपस्थित होते. प्यारेलाल शर्मा यांनी यावेळी केंद्र सरकारसह राज्य शासनाचे आभार मानले.

या वर्षीचा पद्म पुरस्कार प्रदान सोहळा ९ मे २०२४ रोजी राष्ट्रपती भवन येथे झाला.

या सोहळयामध्ये श्री. शर्मा उपस्थित राहू शकले नसल्याने राज्याचे मुख्य सचिव आणि मुख्य राजशिष्टाचार अधिकारी यांच्या हस्ते श्री. शर्मा यांच्या निवासस्थानी जाऊन आज हा पुरस्कार प्रदान करण्यात आला.

## कोंकण विभाग पदवीधर मतदारसंघाच्या निवडणूकीत १३ उमेदवार रिंगणात,१२ उमेदवारांनी उमदेवारी अर्ज मागे घेतले

**नवी मुंबई :** भारत निवडणूक आयोगाने जाहीर केलेल्या कोकण विभाग पदवीधर मतदारसंघाच्या द्विवार्षिक निवडणूकीसाठी दिनांक ७ जून, २०२४ पर्यंत स्वीकारण्यात आलेल्या एकूण २५ अर्ज नामनिर्देशनपत्रांची छाननी झाल्यानंतर १२ अर्ज नामनिर्देशन मागे घेण्यात आले असून निवडणूकीच्या रिंगणात १३ उमेदवार शिल्लक राहिले आहेत. अशी माहिती भारत निवडणूक आयोगाने दिली आहे. मा.भारत निवडणूक आयोगाच्या प्रसिध्दी पत्रकान्वये महाराष्ट्र विधान परिषदेसाठी कोकण विभाग पदवीधर मतदार संघाच्या व्दिवार्षिक निवडणूकीच्या जाहिर करण्यात आलेल्या कार्यक्रमानुसार अर्जांची छाननी झाल्यानंतर आज बुधवार दिनांक १२ जून २०२४ रोजी दुपारी ३.०० वाजेपर्यंत उमेदवारी अर्ज मागे घेण्याची मुदत संपली आहे. नामनिर्देशन पत्र दाखल करण्याच्या कालावधीत छाननी दरम्यान एकूण २५ उमेदवारांचे नामनिर्देशन वैध ठरवून स्विकृत करण्यात आले होते. कोकण विभाग पदवीधर मतदार संघातून १) ॲड घोन्साल्वीस जिमीम मॅतेस,२) निलिमा निरंजन डावखरे, ३) केदार शिवकुमार काळे,४) संजय भाऊराव मोरे, ५) अस्मा जावेद चिखलेकर, ६) डॉ.प्रकाश पाडूरंग भांगरथ, ७) अंकिता कुलदीप वर्तक, ८) अमित जयसिंग सारिया, ९) किशोर ओतरमल जैन, १०) डॉ.भगवान अभिमानसिंग रजपूत, ११) प्रा.राजेश संभाजी सोनावणे, १२) अमोल रतन गौतम जगताप असे एकूण १२ उमेदवारांनी आपले उमेदवारी अर्ज मागे घेतले आहेत.

निवडणूक लढविणाऱ्या उमेदवारांची संख्या १३ झाली आहे. ते पुढील प्रमाणे १) कीर रमेश श्रीधर, इंडियन नॅशनल कॉंग्रेस, २) डावखरे निरंजन वसंत, भारतीय जनता पार्टी, ३) विश्वजित तुळशीराम खंडारे, भीमसेना , ४) अमोल अनंत पवार, अपक्ष ५) अरुण भिकण भोई (प्राचार्य),अपक्ष ६) अक्षय महेश म्हात्रे, अपक्ष, ७) गोकुळ रामजी पाटील, अपक्ष , ८) जयपाल परशूराम पाटील, अपक्ष ९) नागेश किसनराव निमकर,अपक्ष१०) प्रकाश वड्डेपेल्ली, अपक्ष ११) मिलिंद सिताराम पाटील, अपक्ष १२) ॲड. शैलेश अशोक वाघमारे, अपक्ष,१३) श्रीकांत सिध्देश्वर कामुर्ती,अपक्ष असे आहेत.

कोकण विभाग पदवीधर मतदार संघाच्या निवडणुकीचे मतदान बुधवार २६ जून २०२४ रोजी सकाळी ७.०० ते सायंकाळी ६.०० वाजेपर्यंत या वेळेत होणार आहे. अशी माहिती सहाय्यक निवडणूक निर्णय अधिकारी तथा कोकण विभागाचे उपायुक्त (सामान्य) अमोल यादव यांनी एका प्रसिद्धी पत्रकान्वये केले आहे.






9223542691
022 2755 2692

ADVOCATE
Adv. RAMESH A. DAMALE
B. Com, B.L.S LL.B Advocate High Court
**Office :** Shop No.6, "ashirwad" Sector-16, (opp.gurudwara)
Plot No.99,Koperkhairane, Navi Mumbai - 400709.
**Email.:** rameshdamale@yahoo.com

आर्थिक दृष्ट्या गरीब नागरिकांसाठी मोफत सल्ला

श्री. दिपक पुंडे (गुरुजी)
मो. 8104661572
9594296217



श्री दत्त दिगंबर
धार्मिक विधी केंद्र

सर्व धार्मिक पुजा, नवग्रह शांती, नक्षत्र शांती, अभिषेक, विवाह, मुंज,
सत्यनारायण महापुजा, वास्तुशांती, नवचंडी शास्त्रोक्त पद्धतीने केले जातील.

दत्त मंदिर, सेक्टर-२०, तुर्भे (वाशी), नवी मुंबई - ४००७०५.

# आंब्याच्या कोयी संकलन उपक्रमात ५० हजाराहून अधिक कोयी जमा करत नागरिकांचा पर्यावरणशील सहभाग

**नवी मुंबई :** वेगवेगळ्या प्रकारचे नाविन्यपूर्ण उपक्रम राबवून शहर स्वच्छतेत तसेच पर्यावरण रक्षण, संवर्धनात नवी मुंबई महानगरपालिका नेहमीच आघाडीवर राहिली असून याच धर्तीवर जागतिक पर्यावरण दिनाचे औचित्य साधून नमुंमपा आयुक्त डॉ. कैलास शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली आंब्याच्या कोयी संकलनाची विशेष मोहीम हाती घेण्यात आली आहे. या अभिनव उपक्रमाचे नागरिकांकडून महानगरपालिकेची प्रशंसा करीत उत्स्फुर्त स्वागत करण्यात आले असून या उपक्रमास उत्तम प्रतिसाद देत ५० हजाराहून अधिक आंब्याच्या कोयींचे संकलन करण्यात आले आहे.







यामध्ये शहरातील ज्युस सेंटर्स, रेस्टॉरंट्स व हॉटेल्स येथून आंब्याच्या कोयी संकलन करण्यात येत आहेतच शिवाय सोसायट्यांमधील नागरिकही आपल्याकडील आंब्याच्या कोयी धुवून व सुकवून महानगरपालिकेने यासाठी तयार केलेल्या विशेष वाहनात देत आहेत.

स्वच्छ भारत मिशनमध्ये कचऱ्याचे वर्गीकरण हा अत्यंत महत्वाचा घटक असून कोयी संकलन उपक्रमामुळे सर्वसाधारणपणे नागरिकांकडून ओल्या कचऱ्यात टाकून दिल्या जाणाऱ्या कोयी वेगळ्या काढल्या जाणार असून त्या कोयींतून वृक्षरोपे तयार केली जाणार असल्याने निसर्गाचे देणे निसर्गाला परत करून वसुंधरा रक्षण : संवर्धनाचेही काम होणार आहे.

आंब्याच्या कोयी संकलनासाठी परिमंडळ १ व परिमंडळ २ क्षेत्रासाठी विशेष वाहने तयार करण्यात आली असून ही वाहने त्यांना नेमून दिलेल्या क्षेत्रात फिरून नागरिक व संबंधित व्यावसायिकांकडून कोयी संकलित करीत आहेत.

हा उपक्रम 'रेड एफएम' या लोकप्रिय एफएम रेडिओ वाहिनीमार्फत राबविल्या जाणाऱ्या 'गुठली रिटर्न्स' या उपक्रमाशी सुसंगत आहे. त्यामुळे महानगरपालिकेकडे मोठ्या प्रमाणात जमा होणाऱ्या आंब्याच्या कोयींमधून नमुंमपा उद्यान विभागामार्फत आंब्याची रोपे निर्माण करण्यासाठी काही कोयी ठेवून अधिकच्या कोयी रेड एफएम रेडिओ वाहिनीकडे सुपूर्द केल्या जाणार आहेत. वाहिनीकडे संकलित होणाऱ्या कोयी ते ग्रामीण भागातील शेतकऱ्यांपर्यंत आंबा रोप लागवडीसाठी पोहोचवून त्यांना शेतीसोबत उदरनिर्वाहाचा आणखी एक पर्याय उपलब्ध करून देत आहेत.

गुठली रिटर्न्स या पर्यावरणपूरक उपक्रमासाठी नवी मुंबई महानगरपालिकेने घेतलेल्या पुढाकाराचे रेड एफएम वाहिनीव्दारे उत्स्फुर्त स्वागत करण्यात आले असून याविषयी नमुंमपा आयुक्त डॉ. कैलास शिंदे यांच्याशी आरजे मलिष्का यांनी जागतिक पर्यावरण दिनाचे औचित्य साधून वाहिनीवरून थेट संवादही साधला आहे. रेड– एफएम वाहिनीच्या हजारो श्रोत्यांनी नवी मुंबई महानगरपालिकेने गुठली रिटर्न्स उपक्रमात सहकार्याची भूमिका घेतल्याबद्दल कौतुक केले आहे.

नमुंमपा आयुक्त डॉ. कैलास शिंदे यांनी साधारणतः १ लाख आंब्याच्या कोयी वाहिनीव्दारे शेतकऱ्यांना उपलब्ध करुन देणार असल्याचे वाहिनीव्दारे प्रसारित केलेल्या संवादप्रसंगी सांगितले असून नवी मुंबईतील वृक्ष संवर्धनासोबतच महानगरपालिकेमार्फत रेड एफएम वाहिनीच्या गुठली रिटर्न्स या उपक्रमाच्या माध्यमातून शेतकऱ्यांना सहकार्य करुन सामाजिक बांधिलकी जपली जात आहे.

तरी नागरिकांनी आंब्याचा आस्वाद घेऊन झाल्यानंतर त्यांच्या कोयी ओल्या कचऱ्यात न टाकता एखाद्या भांड्यात स्वच्छ धुवून घ्याव्यात आणि उन्हात सुकवाव्यात व नवी मुंबई महानगरपालिकेने यासाठी तयार केलेल्या विशेष वाहनात १५ जूनपर्यंत वर्तमानपत्रात गुंडाळून अथवा बॉक्समध्ये द्याव्यात असे आवाहन करण्यात येत आहे.

# माथेरानमध्ये अखेर हात रिक्षाचालकांच्या हातात ई रिक्षाचे स्टेअरींग

**अलिबाग:** माथेरानमध्ये हात रिक्षा ओढणाऱ्या चालकांच्या हातात ई रिक्षाचे स्टेअरींग आले आहे. पहिल्या टप्प्यात २० ई रिक्षा हात चालकांसाठी उपलब्ध झाल्या आहेत. त्यामुळे हात रिक्षांच्या कष्टप्रद जाचातून रिक्षा चालकांची सुटका होणार आहे. माथेरानमधील हात रिक्षाची अमानवी प्रथा बंद व्हावी, आणि त्याऐवजी ई रिक्षा सरू व्हावी यासाठी माथेरान हात रिक्षा संघटनेच्या वतीने सर्वोच्च न्यायालयात दाद मागण्यात आली होती.

या याचिकेवर सुनावणी दरम्यान न्यायालयाने आजच्या युगात मानवाकडून ओढल्या जाणाऱ्या हात रिक्षा कशा सुरू राहू शकतात असे म्हणत राज्यसरकारला फटकारले होते. यानंतर सुरुवातीला तीन महिन्यांसाठी प्रायोगिक तत्वावर माथेरानमध्ये ई रिक्षा चालविण्यास मंजुरी दिली होती. आता पुढील आदेश होत नाही तोवर ई रिक्षा प्रकल्प प्रायोगिक तत्वावर सुरूच ठेवण्याचे निर्देश न्यायालयाने दिले आहेत. त्यामुळे माथेरानमध्ये ई रिक्षा पुन्हा एकदा धावू लागली आहे. पण ई रिक्षा चालविण्यासाठी माथेरान नगर परिषदेने सुरवातीला ठेकेदारांची नियुक्ती केली होती. त्यामुळे हात रिक्षा चालकांच्या पदरी पुन्हा एकदा निराशा आली होती. माथेरानच्या ई रिक्षा चालविण्यासाठी हात मिळावी यासाठी हात रिक्षा संघटना आग्रही होत्या. त्यासाठी आवश्यक प्रशिक्षण घेतले होते. रिक्षा चालवण्यासाठी आवश्यक परमिट आणि परवानेही त्यांनी प्रादेशिक परिवहन विभागाकडून घेतले होते. मात्र हात रिक्षा चालकांना डावलून माथेरान नगर परिषदेनी पुन्हा एकदा ठेकेदाराची नियुक्ती केली होती. त्यामुळे हात रिक्षाचालकांना पुन्हा एकदा हातरिक्षाच ओढण्याची वेळ आली होती. त्यामुळे हात रिक्षाचालकांनी पुन्हा एकदा न्यायालयात दाद मागितली होती. १५ एप्रिलला झालेल्या सुनावणीत सर्वोच्य न्यायालयाने २० ई रिक्षा सुरू करण्यास परवानगी दिली होती. यानंतर निर्देशानंतर आता माथेरानचा ई रिक्षा प्रकल्प श्रमिक रिक्षा संघटनेच्या ताब्यात देण्यात आला आहे. हात रिक्षाचालकांनी पहिल्या टप्प्यात २० रिक्षा खरेदी केल्या असून, त्या सोमवारपासून प्रवाशांच्या सेवेत रुजू झाल्या आहेत. यावेळी विविध पक्षांचे पदाधिकारी आणि स्थानिक नागरीक मोठ्या संख्येने उपस्थित होते. मुख्याधिकारी राहुल इंगळे यांनी हिरवा झेंडा दाखवून या २० ई रिक्षांच्या सेवेचा शुभारंभ केला, अशी माहिती ई रिक्षासाठी न्यायालयात याचिका करणाऱ्या सुनील शिंदे यांनी दिली.



# खासदार रामदास आठवले यांना केंद्रीय राज्यमंत्री पद मिळाल्याने बिंदू चौक येथे साखर वाटप





**कोल्हापूर (प्रतिनिधी):** रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया चे राष्ट्रीय अध्यक्ष रामदास आठवले यांची केंद्रीय सामाजिक न्याय राज्यमंत्री म्हणून तिसऱ्यांदा शपथविधी झाला. २०२४च्या निवडणुकीत रिपब्लिकन पक्षाला लोकसभेची एक ही जागा मिळाली नसतानाही संपूर्ण भारतभर रामदास आठवले यांनी व पक्षाच्या पदाधिकारी कार्यकर्त्यांनी निष्ठापूर्वक काम केल्याने त्याची पोहोच पावती म्हणून रामदास आठवले यांना मंत्रिमंडळात समाविष्ठ करून घेण्यात आले.

यानिमित्ताने कोल्हापुरातील ऐतिहासिक बिंदू चौकातील डॉ. बाबासाहेब आंबेडकर व क्रांतीबा ज्योतिबा फुले यांच्या पुतळयास रिपब्लिकन पक्षाचे महाराष्ट्र राज्य संघटक सचिव प्रा. शहाजी कांबळे यांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले.

याप्रसंगी खुपिरे ग्रामपंचायत सदस्य अमर कांबळे, कुंडलिक उर्फ बद्दू भामटेकर, सर्जेराव भालेकर, रोहित भालेकर, बाबासाहेब धनगर, शिवराम बुधाळकर व आर.पी.आय. कार्यकर्त्यांनी पेढे, साखर वाटून आनंदोत्सव साजरा केला.



दैनिक
जनसामान्यांच स्वतंत्र व्यासपीठ
स्टार बातमी
वृत्तपत्रास हार्दिक शुभेच्छा!
मान. आयु. चंद्रकांत (दादा) डावरे
डावरे होम्स मेकर्स, नवी मुंबई, उद्योगपती



दैनिक
स्टार बातमी



दैनिक स्टार बातमी वाचक व जाहिरातदारांसाठी कळविण्यात येते की, स्टार बातमी वृत्तपत्रासाठी जाहिरात, लेख, बातम्या, मुलाखती यासाठी संपर्क साधावा.
पत्ता: एस.एस टाईप रूम नंबर १० सेक्टर २ वाशी नवी मुंबई
Email :starbatmi@gmail.com
Website : www.dainikstarbatmi.com
Phone No: 7498120036
Office no. 9892370036

**Owner** Balasaheb Suryakant Mirje Publisher Balasaheb Suryakant Mirje Printer Balasaheb Suryakant Mirje **Printed** at "Siddhakala Print Media & Publication Private Limited" W-230, T.T.C Industrial Area, MIDC, Thane Belapur Road,Koperkhairane, Navi Mumbai - 400710 and **Published** from Room No 10, S S Type, Sector -2,Opp Meghraj Multiplex, Vashi, Navi Mumbai400703, Dist. Thane,
**Editor- Balasaheb Suryakant Mirje**